Government Of Maharashtra

Office of the Director General of Police, Maharashtra State

Maharashtra State Police Headquarters, Shahid Bhagat Singh Marg, Colaba, Mumbai 400 001

क्र. पोमसं/९/NGO/ऑनलाईन/का.अ./२३-२४/६३/२०२२/-77 मुंबई, दि.१५/३/२०२५

परिपत्रक:-

संदर्भ: महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग क्र. सीएफआर १२१०/प्र.क. ४७/२०१०/तेरा, दिनांक ०१/११/२०११.

**विषय: महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस अधिकारी यांचे सन २०२४-२५ चे कार्यमुल्यमापन अहवाल ऑनलाईन पध्दतीने लिहिण्याबाबत.. ..**

० ० ०

महाराष्ट्र पोलीस दलातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच कार्यालयीन लिपीक यांचे कार्यमुल्यमापन अहवाल लिहिणे व जतन करण्याबाबत उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयान्वये सुचना दिलेल्या आहेत.

२. महापार हे संकेतस्थळ दिनांक १ ऑगस्ट, २०२४ पासून केवळ NICNet किंवा State Wide Area Network (SWAN-DIT) या Internet वर उपलब्ध आहे. सदर सुविधा केवळ NIC WEBVPN (https://saccess.nic.in) उपलब्ध करून दिली आहे. महापारमध्ये कार्यमुल्यमापन अहवाल भरताना येणाऱ्या तांत्रिक अडचणीमुळे ही सुविधा काही पोलीस अधिकारी यांना उपलब्ध झाली नसल्याने सन २०२३-२४ चे कार्यमुल्यमापन अहवाल लिहीण्याची कार्यवाही विवरणपत्र १ मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रलंबीत आहे.

३. सर्व संबंधित घटकांना विनंती करण्यात येते की, ज्या पोलीस अधिकारी यांना NIC WEBVPN (https://saccess.nic.in) यावर Login करण्याची सुविधा उपलब्ध झाली नाही त्यांची यादी तयार करून त्यांचे Login करण्यासंदर्भात येणाऱ्या अडचणी *(उदा. (१) Authentication failed (२) OTP not received (३) Sparrow_Mahapar not seen after login to NIC WEBVPN (https://saccess.nic.in))* इत्यादी एकत्रीत माहिती support-mahapar@nic.in या ईमेलवर तात्काळ पाठवावी.

४. शासनाने कार्यमुल्यमापन अहवाल लिहिण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यासाठी दि. ३१ मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. सद्यस्थितीत विवरणपत्र १ मध्ये नमूद घटकाकडे कार्यमुल्यमापन अहवाल लिहीण्यासाठी, प्रतिवेदन व पुर्नविलोकन करण्यासाठी प्रलंबीत आहे.

५. NIC WEBVPN (https://saccess.nic.in) यावर Login ची सुविधा उपलब्ध करून प्रलंबीत कार्यमुल्यमापन अहवाल लिहीण्याची कार्यवाही दिनांक ३१ मार्च २०२५ पर्यंत पूर्ण करून अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

६. सन २०२४-२५ चे कार्यमुल्यमापन अहवाल लिहीण्यासाठी सदर शासन निर्णयातील सहपत्र २ मध्ये खालील प्रमाणे वेळापत्रक दिलेले आहे. सर्व घटक प्रमुखांनी दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे कार्यमुल्यमापन अहवाल लिहीण्याची कार्यवाही पुर्ण करावी.:-

| | | |
|---|---|---|
| (अ) | स्वयंमूल्यनिर्धारण अहवालासह परिशिष्ट "ब" मधील कार्यमुल्यमापन अहवालाचे कोरे फॉर्म सर्व संबंधित अधिकारी व अंमलदार यांना वाटप करणे | मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवडयात |

| | | |
|---|---|---|
| | सहा. पोलीस निरीक्षक व त्यावरील अधिकाऱ्यांचे ऑनलाईन पार लिहीण्यासाठी Annexure १ ची माहिती सादर करणे | |
| (ब) | स्वयंमूल्यनिर्धारण अहवालासह कार्यमुल्यमापन अहवाल प्रतिवेदन अधिकाऱ्याकडे सादर करणे. | दिनांक ३१ मार्च नंतर लगेचच दिनांक १५ एप्रिलपर्यंत |
| (क) | प्रतिवेदन अधिकाऱ्यांनी परिशिष्ट "ब" भाग-४ लिहून पुनर्विलोकन अधिकाऱ्यांना सादर करणे | दिनांक ३० एप्रिल पर्यंत |
| (ड) | पुनर्विलोकन अधिकाऱ्यांनी परिशिष्ट "ब" भाग-५ पूर्ण करून अहवाल संस्करण अधिकाऱ्यांकडे पाठविणे | दिनांक १५ मे पर्यंत |
| (इ) | संस्करण अधिकाऱ्याने सर्व कार्यमुल्यमापन अहवालांचे संस्करण करून अशा कार्यमुल्यमापन अहवालाच्या झेरॉक्स प्रती सर्व संबंधित अधिकारी व अंमलदार यांना देऊन त्याची पोच घेणे | दिनांक ३० जून पर्यंत |
| (फ) | कार्यमुल्यमापन अहवाला विरूध्द अभिवेदन करणे | कार्यमुल्यमापन अहवालाची झेरॉक्स प्रत मिळाल्यापासून एक महिन्यांत |
| (ग) | अभिवेदनावर प्रतिवेदन व पुनर्विलोकन अधिकाऱ्यांचे अभिप्राय प्राप्त करून शेरे काढणे / न काढणे याचा निर्णय घेण्याची कार्यवाही करणे. | अभिवेदन प्राप्त झाल्यापासून ३ महिने |

७. कार्यमुल्याकन अहवाल लिहीतांना संबंधीत पोलीस अधिकारी यांना वर्षभरात नेमूण दिलेल्या कामाची माहिती व त्याअनुषंगाने वर्षभरात पुर्तता केलेल्या कामाची माहिती कार्यमुल्यमापन अहवालात दाखवावी. तसेच जे प्रतिवेदन व पुनर्विलोकन अधिकारी आहेत त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे एकूण लिहीलेल्या व प्रलंबीत असलेल्या कार्यमुल्यांकन अहवालाची आकडेवारी कार्यमुल्यमापन अहवाल लिहीतांना द्यावी. कार्यमुल्यमापन अहवाल लिहीतांना सचोटी व चारित्र्य प्रतिकुल असल्यास आवश्यक पुरावे सोबत जोडावे.

८. महापार आज्ञावलीमध्ये ऑनलाईन अभिवेदन करण्याची तरतुद सध्या सुरू करण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रतिकुल शेऱ्याविरूध्द अभिवेदन करतांना कार्यमुल्यमापन अहवाल स्वीकारून लेखी स्वरूपात **फक्त पदोन्नतीच्या आड येणाऱ्या प्रतिकुल शेऱ्याविरूध्द** एक महिन्याच्या आत अभिवेदन करावे. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग क्र. सीएफआर १२१०/प्र.क. ४७/२०१०/तेरा, दिनांक ०१/११/२०११ मधील तरतुदीनुसार घटकामार्फत प्राप्त विहीत केलेल्या कालावधीत प्राप्त होणारे आणि फक्त पदोन्नतीच्या आड येणाऱ्या शेऱ्यावर या कार्यालयाकडून उचित कार्यवाही केली जाईल. घटक प्रमुखांनी प्रतिकुल शेऱ्याविरूध्दचे अभिवेदन पाठवितांना प्रतिवेदन अधिकारी व पुनर्विलोकन अधिकारी यांचे अभिप्राय घेवूनच त्यांच्या योग्य शिफारशीसह अभिवेदन पाठवावे. घटक प्रमुखामार्फत न येणाऱ्या परस्पर पाठविण्यात येणाऱ्या अभिवेदनावर या कार्यालयाकडून कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही.

९. राज्य पोलीस सेवेतील पोलीस उप अधीक्षक या व त्यावरील संवर्गाच्या समकक्ष संवर्गातील अधिकाऱ्यांचे कार्यमुल्यमापन अहवाल राज्य पोलीस सेवा ते भारतीय पोलीस सेवेच्या नामांकनासाठी केंद्र शासनास पाठवावे लागत असल्याने त्यांनी कार्यमुल्यमापन अहवाल मराठी व इंग्रजीमध्ये लिहावे. शासन निर्णय गृह विभाग पत्र क्र. रापोसे-३६१५/प्र.क्र.१३९/पोल-१अ, दि. १५/७/२०१५.

१०. सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकाऱ्यांनी ते निवृत्त होण्यापूर्वी त्यांच्या हाताखालील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे कार्यमुल्यमापन अहवाल प्रतिवेदन / पुनर्विलोकन केले आहेत काय हे पाहण्याची जबाबदारी संबंधित आस्थापना शाखेची आहे. ज्यावेळी प्रतिवेदन अधिकारी सेवानिवृत्त होणार असेल त्यावेळी त्या प्रतिवेदन अधिकाऱ्याकडून तो सेवानिवृत्त होण्यापूर्वी आस्थापना शाखेने कार्यमुल्यमापन अहवाल लिहून घ्यावेत. सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकाऱ्यास त्याच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापुर्वी दोन महिने, आस्थापना शाखेने कार्यमुल्यमापन अहवाल देणे आवश्यक आहे.

११. तरी, सर्व संबंधीत घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सन २०२४-२५ या वर्षाच्या कार्यमुल्यमापन अहवालासंदर्भात उपरोक्त सुचनांचे पालन करून कार्यवाही विहीत वेळेत पूर्ण करावी.

13/03/25

(डॉ सुखविंदर सिंह)
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरीता

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त (मुंबई सस्नेह सादर)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, म.राज्य, मुंबई / दहशतवाद विरोधी पथक, म.राज्य, मुंबई / गुन्हे अन्वेषण विभाग, म.रा., पुणे / प्रशिक्षण व खास पथके, म.रा., मुंबई / फोर्स वन, मुंबई / नागरी हक्क संरक्षण, म.रा., मुंबई/ वाहतूक म.रा., मुंबई /राज्य राखीव पोलीस बल म.रा., मुंबई /विशेष कृती
संचालक, पोलीस समन्वय व दळणवळण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, वडाची वाडी, पुणे
सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक/ पोलीस उप महानिरीक्षक परिक्षेत्रिय / महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग, म.राज्य, मुंबई / मोटार परिवहन पुणे / रा.रा.पो.बल पुणे / नागपूर / नक्षल विरोधी अभियान, नागपूर/ सायबर सेल, मुंबई
सर्व पोलीस अधीक्षक (जिल्हा / रेल्वे / बिनतारी संदेश)
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र
प्राचार्य, गुन्हा अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक
प्राचार्य, अपारंपारीक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर

प्रत:

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. २/३/१०
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष

२. कृपया सदर परिपत्रक पोलीस महासंचालक यांचे संकेतस्थळावर "कार्यमुल्यमापन अहवाल सन २०२४-२५" व इंग्रजीमध्ये "Personal Appraisal Report 2024-25" या शिर्षाखाली प्रसारित करावे.

| | Organization | PAR Generated | Pending With Officer Reported Upon | Pending With Reporting Authority | Pending With Reviewing Authority | Pending With CR Section for Closing | PAR Closed |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | HOME (DySP/SP) | 1,040 | 257 | 92 | 143 | 35 | 513 |
| 2 | MPA | 50 | 3 | 3 | - | - | 44 |
| 3 | CP Pune | 275 | 14 | 3 | 76 | 6 | 176 |
| 4 | ATS | 126 | - | 5 | 1 | - | 120 |
| 5 | ANO / UOTC | 12 | 3 | - | 2 | - | 7 |
| 6 | HSP / TRAFFIC | 98 | - | - | 2 | 5 | 91 |
| 7 | PCR | 77 | 1 | 1 | 8 | 1 | 66 |
| 8 | CP Amravati | 87 | - | 6 | 3 | 5 | 73 |
| 9 | SRPF | 214 | 41 | 13 | 9 | 1 | 150 |
| 10 | Wireless | 111 | - | 1 | 15 | - | 95 |
| 11 | CP SOLAPUR | 81 | - | 14 | 4 | 1 | 62 |
| 12 | CP NASHIK | 141 | 31 | 15 | 6 | - | 89 |
| 13 | ACB | 333 | - | 2 | 51 | 5 | 275 |
| 14 | CP MUMBAI RAILWAYS | 78 | 17 | 3 | - | - | 58 |
| 15 | RAILWAYS | 113 | 3 | 2 | 11 | - | 97 |
| 16 | IGP AMRAVATI RANGE | 566 | - | 129 | 161 | - | 276 |
| 17 | IGP KOLHAPUR RANGE | 530 | - | 3 | 25 | 267 | 235 |
| 18 | DGP OFFICE | 26 | - | 2 | 1 | 4 | 19 |
| 19 | CP THANE | 470 | 123 | 98 | 40 | - | 209 |
| 20 | FORCE ONE | 21 | - | - | - | - | 21 |
| 21 | IGP KONKAN RANGE | 254 | 19 | 46 | 9 | - | 180 |
| 22 | IGP NANDED RANGE | 320 | - | 16 | 40 | 1 | 263 |
| 23 | IGP AURANGABAD RANGE | 262 | 1 | 3 | 4 | 15 | 239 |
| 24 | MOTOR TRANSPORT | 83 | 11 | 13 | 5 | 1 | 53 |
| 25 | IGP NAGPUR RANGE | 335 | 56 | 91 | 57 | 6 | 125 |
| 26 | CP MUMBAI | 2,123 | 1 | 38 | 128 | 218 | 1,738 |
| 27 | CID | 359 | - | 50 | 52 | 93 | 164 |
| 28 | CYBER | 7 | 1 | 1 | 3 | - | 2 |
| 29 | DEPUTY IGP GADCHIROLI RANGE | 185 | 12 | 38 | 6 | - | 129 |
| 30 | CP NAVIMUMBAI | 278 | 1 | 17 | 34 | 4 | 222 |
| 31 | CP NAGPUR | 342 | - | 5 | 59 | - | 278 |
| 32 | TRAINING | 261 | 15 | 10 | 25 | 53 | 158 |
| 33 | DGP OFFICE MINISTERIAL | 175 | 21 | 21 | 11 | - | 122 |
| 34 | SID | 337 | - | 23 | 12 | - | 302 |
| 35 | IGP NASHIK RANGE | 445 | 71 | 76 | 41 | 34 | 223 |
| 36 | CP AURANGABAD | 94 | 8 | 21 | 28 | 3 | 34 |
| 37 | CP MUMBAI OFFICE MINISTERIAL | 35 | - | - | 3 | - | 32 |
| 38 | CP PIMPRI-CHINCHWAD | 147 | 44 | 13 | 23 | - | 67 |
| 39 | VIP SECURITY | 194 | 12 | 18 | - | - | 164 |
| 40 | CP MIRA-BHYANDER | 263 | - | - | 3 | 1 | 259 |
| | Total | 10,948 | 766 | 892 | 1,101 | 759 | 7,430 |